# भुयारी मेट्रोची वाहतूक चाचणी यशस्वी

मुंबई (प्रतिनिधी) : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मुंबई मेट्रो ३ लाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो लाइन ३ च्या चाचणी गत वर्षीपासून सुरू आहेत. या मेट्रोने प्रकल्पातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. आज एमआयडीसी ते विद्यानगरी मेट्रो स्टेशन दरम्यान ट्रेनची वाहतूक चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मुंबई मेट्रो ३ चे बांधकाम २०१६ पासून सुरू आहे. मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो लाइन ३ ची चाचणी ऑगस्ट २०२२ पासून सुरू झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या चाचणीचा शुभारंभ करण्यात आला होता. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आरे सारीपूतनगर इथे ट्रायल रनला हिरवा झेंडा दाखवला. सारीपूतनगर ते मरोळ नाका येथील ट्रॅकवर ट्रायल रन घेण्यात आली. सारीपूतनगर ते मरोळ नाका स्थानकादरम्यान ३ किमी लांबीच्या बोगद्यात ही चाचणी घेण्यात आली होती. तेव्हापासून मेट्रोच्या विविध चाचणी सुरू आहेत. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ३३.५ किमी लांबीचा भूमिगत मेट्रो कॉरिडोर तयार करत आहे.

**एमआयडीसी ते विद्यानगरीपर्यंत धावली मेट्रो**

आरे ते कफ परेड या मेट्रो ३ भूमिगत मार्गिकेसाठी आठ गाड्या आरे येथील कारशेडमध्ये दाखल झाल्या आहेत. ताशी ८५ किमी वेगाने १६ किमी अंतर कापण्यासाठी या मेट्रो गाड्या सज्ज आहेत. डिसेंबरपर्यंत या मार्गिकेचा पहिला टप्पा सुरू करण्याचा मानस असून आणखी एका गाडीची त्यासाठी प्रतीक्षा आहे.